Estd.:1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना कळवण्यात येते की सोमवार दिनांक २३/०३/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता "शहीद दिनानिमित्त" विद्यापीठातील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशालामार्फत मुख्य प्रशासकीय इमारतीमधील पोर्चमध्ये "शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव" यांच्या प्रतिमेस मा. प्रभारी कुलगुरू प्रा.(डॉ.) सुरेश गोसावी यांच्या शुभहस्ते व मा. प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.(डॉ.) ज्योती पी. जाधव व मा. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

प्र. संचालक
अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशाला
Director
School of Engineering & Technology,
Shivaji University, Kolhapur.

जा.क्र. /शि.वि./अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशाला/8167

दिनांक : १६/०३/२०२६

प्रति,

१. स्वीय सहाय्यक - मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्य मापन विभाग वित्त लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.

२. सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभागप्रमुख, संचालक, समन्वयक

३. सर्व उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, कायदा अधिकारी व जनसंपर्क अधिकारी.

४. सर्व रेक्टर यांनी सदरचे परिपत्रक वसतिगृहातील नोटीस बोर्डवर लावण्याची व्यवस्था करावी.

५. अभियांत्रिकी विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता व इतर व्यवस्था करावी.

६. उद्यान विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी कुंड्या ठेवण्यात याव्यात.

७. जमादार यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक टेबल, स्टूल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्यावेळी मदतीस एक शिपाई द्यावा.

८. सदरचे परिपत्रक इंटरनेट विभागाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी ठेवावे.

९. सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनिंना निदर्शनास आणावे.

१०. विद्यार्थी विकास विभाग यांना माहितीसाठी.